# कुडतरकरांची एक कविता : एक अनुभव

– डॉ. सु. म. तडकोडकर

आज आपणा सर्वांस एका सुरेख रचनाबंधात साकारलेल्या कवितावाचनाचा आनंद घ्यायचा आहे. ही कविता प्रथम डोळ्यांसमोर ठेवून वाचन करणे आवश्यक आहे. तत्पूर्वी काही गृहीतके मान्य करून घ्यायची आहेत. ती पुढील प्रमाणे : जसे काव्याचे वाचन होऊ शकते तसे त्याच काव्याचे पुनर्वाचनही होऊ शकते. जसा कवीने आपल्या हाती ठेवलेल्या काव्याच्या रचनाबंधाचा आनंद घेता येतो तसा त्या कवीला किंचितसे विस्मरून त्याच काव्यरचनेच्या पुनर्बांधणीचाही आनंद द्विगुणित करून घेता येतो, संपूर्ण काव्य बंधसारखेच त्यातील एखाद्याच चरणबंधानेही आपण धुंदूनच जातो. जीवनाविषयीचा साक्षात्कार अशाच रचनाबंधातून होणे शक्य होते. किंबहुना उत्तम काव्याचा तो गुणच होय. साठोत्तरी कालातील गोमंतकीय कवींच्या मांदियाळीत कविवर्य अवधूत यशवन्त कुडतरकर यांच्या काव्यरचनेत हा गुण असल्याने विशेषत्वाने जाणवते. कुडतकरांची मूळ कविता अशी आहे.

## नसानसातून ...

नसानसातून भिनले काही
नकळत जडले नाते
आयुष्याची ओढ अनावर
शब्दावाचून गाते
नव्हती ओळख नव्हते काही
रेषा नव्हत्या जुळल्या
पाऊस होऊन चिम्ब सरींचा
व्यथा पुन्हा कोसळ्या
पुन्हा एकदा ओठावरती
स्तोत्रे असली जुळली
आत कुठेशी सांज अनोखी
अनंग रंगी झाली
नसानसातून भिनले काही
नसात भिनली युगे
कायमची ही कविता अर्धी
पूर्ण त्यातली जगे.

या कवीला किंचितसे विस्मरून त्याच काव्यरचनेच्या पुनर्बांधनणीचाही आनंद द्विगुणित करून घेता येतो किंवा काय असे पाहू गेल्यास तीच कविता खालील रचनाबंध स्वत:चा, आकार धारण करते.

## नसानसातून

*पुन्हा एकदा ओठावरती स्तोत्रे असली जुळली*
*आत कुठेशी सांज अनोखी अनंग रंगी झाली;*
*नसानसातून भिनले काही नसात भिनली युगे*
*कायमची ही कविता अर्धी पूर्ण त्यातली जगे....*

*नसानसातून भिनले काही नकळत जडले नाते*
*आयुष्याची ओढ अनावर शब्दावाचून गाते ;*
*नव्हती ओळख नव्हते काही रेषा नव्हत्या जुळल्या*
*पाऊस होऊन चिम्ब सरींचा व्यथा पुन्हा कोसळ्या*

**अवधूत यशवन्त कुडतरकर**

या कवितेच्या रचनाबंधाची अशी पुनर्बांधणी केल्यामुळे तिच्यातील स्वाभाविक अंतर्लय संवेदनशील व्यक्तीला अधिक चांगल्या पद्धतीने स्पर्शू लागते. उत्तम कवितेचे वैशिष्ट्य असे की तिच्यात शब्दांचे गारूड नसणे आणि तिच्या रचनाबंधातून एकाहून अधिक अर्थ उलगडत जाणे हे होय. कुडतकरांच्या 'नसानसातून' या कवितेचेही हे एक वैशिष्ट्य होय असे नि:शंकपणे म्हणता येते.

*पुन्हा एकदा ओठावरती स्तोत्रे असली जुळली*
*आत कुठेशी सांज अनोखी अनंग रंगी झाली.*

सत्य आकळले की त्याच्या अस्तित्वामुळेच तर आयुष्याला थोडाफार अर्थ लाभू शकतो हे आपण जाणून असतो; परंतु अशा कोणत्या शक्तीमुळे मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा अर्थ सुस्पष्ट होत जातो? आपल्याला जगण्याविषयीची इतकी ओढ का हे त्यामुळेच आकळत असते. नित्यनूतन असलेली ही प्रतिभाशक्ती विविध रंगरूपात विहरत अवचितपणे ओठावरती येत असते. येताना तिचे रूप एकाच प्रकारचे असते काय? छे ! छे ! कवी पावित्र अशा वातारणात असेल तर ती स्तोत्रे गात येते आणि तो आयुष्याच्या सांजघडीला न्याहाळत

असला तरी मदनाला आवाहत, अनंग रंगी होत येते. तिच्या कार्यकलापाविषीचे काही आकळणे कठीणच!

*नसानसातून भिनले काही नसात भिनली युगे*
*कायमची ही कविता अर्धी पूर्ण त्यातली जगे....*

या कवितेत प्रतिभाशक्तीचे कल्पनारम्यपणे अवलोकन केले गेले आहे असे म्हणता येते. ही प्रतिभाशक्ती म्हटले तर कवीच्याच नसानसातून भिनून गेलेली. तेव्हा तिचे आणि त्याचे नाते केवळ शब्दांतून कसे काय काव्यबद्ध करता येणार? ते नाते तर केवळ अर्थापलिकडचे. हे नाते युगानुयुगांपासून चालत आलेले. स्वत:पासून तिला भिन्न करता येत नाही आणि ती स्वत:तच भिनलेली असली आणि तिला आकळून घेण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तिच्याविषयीचे आकलन करून घेणे हे कधीच पूर्णपणे जमणारे काम नव्हे. उलट तिच्यात जीवनाच्या आणि जगण्याविषयीच्या इतर विविध वैषयिक बाबींचे कुतुहल मात्र पुर्णपणे जागृत होत जाते. त्यामुळेच तर तिची ओढ अनावर होत जाते.

*नसानसातून भिनले नकळत जडले नाते*
*आयुष्याची ओढ अनावर शब्दावाचून गाते*

नवल वाटते ते या गोष्टीचे की ती प्रतिभाशक्ती इतकी नसानसात भिनलेली असतानादेखील या पूर्वी तिचा परिचय कसा काय होऊ शकला नाही? रेषा का जुळल्या नाहीत? उलट जगण्याविषयीच्या इतर विविध वैषयिक बाबींचे कुतुहल चाळवले जाऊ लागले आणि त्यामुळेच जेव्हा जगणे कठीण होऊ लागले तेव्हा मात्र तिचा परिचय झाला. कोणालाही न समजाणाऱ्या व्याथांच्या सरी कोसळू लागल्या तशा दोघांच्या मधोमध असलेली अनोळखीपणाची रेषादेखील राहिली नाही... त्यातून एक सत्य आकाराला आले की जोपर्यंत जीवनात संघर्ष निर्माण होत नाही तोपर्यंत माणसाला स्वत:तील अनुनभूत प्रतिभाशक्तीचा परिचय होत नाही.

*नव्हती ओळख नव्हते काही रेषा नव्हत्या जुळल्या*
*पाऊस होऊन चिम्ब सरींचा व्यथा पुन्हा कोसळला...*

❖ ❖ ❖